क्र.म.रा.वि.म./०१/प्रशासन/ २१०२,
27 JUL 2007

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

प्रति,

**सर्व सहाय्यक माहिती अधिकारी / माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी,**
म.रा.र.वि.म.मर्या.,
मुंबई-

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली करावयाची कार्यवाही**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये महामंडळाकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात अर्जदाराने मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे केलेल्या अपीलावरील सुनावणी दरम्यान मा.मुख्य माहिती आयुक्तांनी दिलेल्या आदेशांस अनुसरुन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. महामंडळाने प्रसिध्द केलेली माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची यादी महामंडळाच्या प्रत्येक शिबीर कार्यालयात दर्शनी भागी लावण्यात यावी. या यादीत वेळोवेळी झालेल्या फेरफारांची दखल घेऊन सदर यादी अद्ययावत राहील असे पाहावे.
२. या अधिनियमाखाली कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज / अपील त्याच दिवशी संबंधित माहिती अधिका-यांकडे पाठविण्यात यावेत. एखादा अर्ज / अपील त्या कार्यालयाशी संबंधित नसल्यास ते संबंधित कार्यालय / अधिकारी यांच्याकडे ५ दिवसांच्या आत पोचविण्याची व्यवस्था करावी व त्याप्रमाणे अर्जदार /अपीलकर्ता यांस कळविण्यात यावे.
३. प्राप्त झालेल्या अर्जावरील / अपीलावरील माहिती अर्जदार / अपीलकर्ता यांस विहित मुदतीत देण्यात यावी. जर मागविण्यात आलेल्या माहितीचा आवाका मोठा असेल व ती विहित मुदतीत पुरविणे शक्य नसेल तर अर्जदारास त्याप्रमाणे कल्पना देण्यात येऊन ती किती कालावधीत पुरविणे शक्य होईल हे त्यांस कळविण्यात यावे व या मुदतीचे पालन कसोशीने करण्यात यावे.

विहित मुदतीत व अचूक माहिती न दिल्यास वरील अधिनियमामध्ये असलेली दंडाची तसेच शिस्तभंग कारवाईची तरतुद विचारात घेऊन असा प्रसंग उद्‌भवू देऊ नये.

वरील सूचनांचे पालन कटाक्षाने होईल याची दक्षता स्वत: घ्यावी तसेच कार्यालयातील अन्य कर्मचा-यांच्या म्हणजे टपाल स्वीकारणारे / पाठविणारे लिपीक तसेच शिपाई यांच्या नजरेस ही बाब आणून देऊन होणा-या गंभीर परिणामांची कल्पना त्यांस देण्यात यावी.

वरील सूचनांखेरीज दि. १८.६.२००७ च्या पत्रातील सूचना खालीलप्रमाणे पुन्हा आपल्या नजरेस आणून देण्यात येत आहेत.

(१) आपल्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांवर /अपीलांवर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल विहित प्रपत्रात प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी मुख्यालयातील समन्वय अधिकारी (श्री.पोंक्षे) यांच्याकडे पाठविण्यात यावा. एखाद्या महिन्याचा अहवाल "निरंक" असला तरी तो पाठविणे आवश्यक आहे.

नेपियन सी रोड, प्रियदर्शिनी पार्क, मुंबई - ४०० ०३६.
दूरध्वनी : २३६८ ६११२/२३६९ ६१०९/३६७१/३६७३ • फॅक्स : २३६८ ४९४३ • ई-मेल : msrdc@bom3.vsnl.net.in
• वेबसाईट : www.msrdc.org

(२) अर्जदारांस /अपीलकर्त्यांस माहिती देण्याची संपूर्ण जबाबदारी माहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी यांची आहे. ही माहिती असेल ती व असेल तशी माहिती अधिका-यांनी स्वतःच्या अखत्यारीत द्यावयाची आहे. त्यामुळे प्रस्तावित उत्तराचा मसुदा मान्यतेसाठी वरिष्ठांकडे सादर करणे अपेक्षित नाही.

वरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि माहितीचा अधिकार कायद्याबाबतच्या प्रकरणांवर विहित मुदतीत उचित कार्यवाही होत आहे याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

**प्रशासकीय अधिकारी**
**म.रा.र.वि.म.मर्या., मुंबई**